८३/घाग

आपली सेवा आमचे कर्तव्य

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग**
**राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त कार्यालय,**
**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई — ४०००३२.**

**ई-मेल :- ccrts@maharashtra.gov.in** **दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८३२३४६**

---

**क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.३२/मुसेहआ** **दिनांक : २८ एप्रिल, २०२१**

वाचा:- १) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. अपिल-२०१७/प्र.क्र.१५/मुसेहआ, दि. २७.०६.२०१७

२) महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग, कोकण महसूली विभागाचे पत्र क्र. GEN-२०२१/Kon.Div/२,दि. २३.०३.२०२१

३) मा. राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव यांचे अ.शा. पत्र क्र. RB-२०२१/Admin/८३३, दि. ०९.०४.२०२१

४) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आरटीएस-२०२१/प्र.क्र.२१५/लोकशाही दिन कक्ष, दि. २२.०४.२०२१

## कार्यालयीन आदेश

सामान प्रशासन विभागाच्या क्र. आरटीएस-२०१६/प्र.क्र.१२४/१८(र. व का.) दि. १३.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेअन्वये श्रीमती मेधा गाडगीळ, सेवानिवृत्त भा.प्र. से. यांची राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोकण महसूली विभाग या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे संदर्भाधीन क्र. १ येथील कार्यालयीन आदेशान्वये, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १३ (२) (ख) नुसार कोकण महसूली विभागासाठी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) प्राप्त होणाऱ्या अपिलांचे व अर्ज / तक्रारी / निवेदनाबाबतचे कामकाज राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोकण महसूली विभाग यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

२. श्रीमती मेधा गाडगीळ यांनी आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग,कोकण महसूली विभाग या पदाचा राजीनामा सादर केला असून,मा. राज्यपाल महोदयांनी संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये सदर राजीनामा मंजूर केल्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २२.०४.२०२१ च्या अधिसूचने अन्वये श्रीमती मेधा गाडगीळ यांना दि. २२.०४.२०२१ (म.नं.) पासून राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसूली विभाग या पदावरुन कार्यमुक्त करण्यात आले आहे.

३. सद्यस्थितीत, आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, कोकण महसूली विभाग हे पद रिक्त आहे. अपिलांच्या कार्यमर्यादेचे उल्लंघन होऊ नये म्हणून, तसेच जनतेस वेळीच न्याय मिळून त्वरीत सेवा प्राप्त व्हाव्यात याकरीता पुढील शासन आदेश निर्गमित होईपर्यंत कोकण महसूली विभागासाठी प्राप्त होणारी

ऑनलाईन / ऑफलाईन स्वरुपातील अपिले/अर्ज /तक्रारी /निवेदनाबाबतचे कामकाज मा. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे.

(आण्णासाहेब चव्हाण)
उपसचिव
राज्य लोकसेवा हक्क आयोग

प्रत:-

१. श्रीमती मेधा गाडगीळ, सेवा निवृत्त, भा.प्र.से, १४/सुनिती, जनरल भोसले मार्ग, फोर्ट, मुंबई
२. प्रधान सचिव, (प्र.सु.र व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, सी.बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
४. सर्व जिल्हाधिकारी, कोकण विभाग
५. उपसचिव, राज्य लोकसेवा हक्क आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ३२
६. कक्ष अधिकारी, राज्य लोकसेवा हक्क आयोग, कोकण महसूली विभाग, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४
७. निवडनस्ती, आस्थापना